मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

follow us : /rajdandlive

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd No.72105/99 ※ वर्ष २५ ※ अंक २९३ सातारा ※ शुक्रवार दि १९ जुलै २०२४ ※ पाने ८ ※ किंमत ५ रू/

# जागावाटपावरून दोन्ही आघाड्यांची डोकेदुखी वाढणार ?





## शिंदे-अजितदादांचं समाधान होणार ?

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या वेळी महाविकास आघाडी आणि महायुतीतले जागावाटप शेवटच्या क्षणापर्यंत सुरू होतं. महाविकास आघाडीत ठाकरेंच्या शिवसेनेने सर्वाधिक जागांवर दावा सांगून काँग्रेसच्याही काही जागा पळवल्या. सांगली, दक्षिण मध्य मुंबई या जागांचा वाद शेवटपर्यंत सुरू होता. तर दुसरीकडे शिंदेंच्या शिवसेनेने भाजपाला चर्चेत शेवटपर्यंत गुंतवून ठाणे, नाशिक संभाजीनगर या जागा आपल्याकडे कायम राखल्या. त्यावरून ४८ जागांच्या वाटपासाठी झालेली रस्सीखेच लक्षात घेता विधानसभेच्या २८८ जागांचे वाटप म्हणजे किती डोकेदुखीच असणार आहे याचा साधारणता अंदाज येतो.

विदर्भात काँग्रेसचा दावा

शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे मुंबईत फारशे अस्तित्व नसले तरी काँग्रेस एवढ्या मोठ्या प्रमाणात मुंबईतल्या जागा सोडेल याची शक्यता तशी कमीच आहे. अर्थात ठाकरेंनी जसा मुंबईतल्या जागांवर रुमाल टाकून आपला हक्क सांगितलाय तसाच काहीसा प्रकार विदर्भातल्या जागांबाबत काँग्रेसकडून आणि पश्चिम महाराष्ट्रातील जागांबाबत शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हे जागावाटप तेवढे सोपे असणार नाही

तिकडे महायुतीतही जागा वाटपाची प्रक्रिया सहज सुलभ असेल असं वाटत नाही. भाजपाने साधारणता १५० ते १६० जागा लढवण्याचे तयारी सुरू केली आहे. तर शिंदेंनी शंभर जागांवर दावा ठोकला आहे. जेवढ्या जागा शिंदेंना मिळतील तेवढ्याच आपल्यालाही मिळाल्या पाहिजेत अशी अजित पवारांच्या राष्ट्रवादीची भूमिका आहे.

**मुंबईत ठाकरेंचा जास्त जागांवर दावा**

**ठाकरेंच्या शिवसेनेने विधानसभेच्या सुमारे सव्वाशे जागा लढवण्यासाठी आत्तापासूनच मोर्चेबांधणी सुरू केली आहे. मुंबईतल्या दोन तृतीयांश जागांवर आपला दावाही ठोकला आहे. लोकसभा निवडणुकीत कमी जागा लढवूनही राज्यातला सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या काँग्रेसला हे मान्य होईल असे वाटत नाही.**

### शिंदे-दादांचं समाधान होणार का ?

**जर सध्याचे संख्याबळ लक्षात घेतलं तर भाजपाचे स्वत:चे आणि सहयोगी पक्षाचे ११४ आमदार आहेत. शिंदेंबरोबर आलेले ५० आणि दादांसोबत असलेले ४०, असं २०० जागाच वाटप तर सहजपणे होऊ शकेल. पण उरलेल्या ८५ जागा कशा वाटायच्या हा प्रश्न येईलच. त्या जागा संख्याबळानुसार वाटायच्या ठरल्या तर भाजपाला ४०-४२ आणि शिंदे आणि अजित पवारांना मिळून ४० अशा जागा दिल्या जातील. यामुळे भाजपाची बेरीज १५० पर्यंत जाईल. पण शिंदेंना मात्र ७० आणि अजितदादांना ६० जागा मिळू शकतील तेवढ्या जागांवर समाधान होईल का? हा प्रश्न आहे. सध्या तरी त्यांची तशी मनस्थिती असल्याचं दिसत नाही.**

### महायुतीत जागांचा पेच कसा सुटणार ?

**या तिघांच्या अपेक्षांची बेरीज केली तर महाराष्ट्रातील विधानसभेचे मतदारसंघ आणखी शंभराने वाढवावे लागतील. याचाच अर्थ २८८ जागांचे वाटप सोपं असणार नाही हाच आहे. २०१९ च्या संख्याबळानुसार जागांचं वाटप करावं असं सूत्र मान्य झालं तरी, २०१४ ला निवडून आलेल्या एकसंघ पक्षाच्या जागा गृहीत धरायच्या की आता शिंदे आणि अजित दादांबरोबर असणाऱ्या आमदार यांची संख्या गृहीत धरायची हा पेच येणारच आहे.**

# विधानसभेआधी समृद्धीचा शेवटचा टप्पा खुला होणार

**मुंबई :** मुंबई आणि आसपासच्या परिसरात राहणाऱ्यांसाठी मोठी बातमी आहे. नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाचा शेवटचा टप्पा विधानसभा निवडणुकीआधी सुरू करण्यात येणार आहे. सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात समृद्धीचं काम पूर्ण होणार आहे. इगतपुरी ते आमणे हा ७६ किलोमीटरचा टप्पा ९८ टक्के पूर्ण झाल्याची माहिती चडठऊचे एमडी अनिलकुमार गायकवाड यांनी दिली.

सध्या नागपूरहून मुंबईला येताना इगतपुरीला एक्स्प्रेसवे संपतो, आणि तिथून मुंबई-नाशिक महामार्ग घ्यावा लागतो. या महामार्गाची पावसाळ्यात दुर्दशा होते. ज्यामुळे तास न् तास वाहतूक कोंडीत अडकावं लागतं. कोस्टल रोड, अटल सेतू, भुयारी मेट्रो आणि आता समृद्धी महामार्ग ही खुला होणार आहे.


### सप्टेंबर अखेरीस काम पूर्ण होणार

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग एकूण ७०१ किमीचा

समृद्धी महामार्गामुळे महाराष्ट्राची राजधानी मुंबई आणि उपराजधानी नागपूर यांना एकमेकांना जोडली जाणार आहे. समृद्धी महामार्गामुळे मुंबई-नागपूर प्रवास सहजरित्या आणि कमी वेळेत होणर आहे. मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग एकूण ७०१ किमीचा आहे. त्यातील नागपूर ते भरवीर असा महामार्ग सध्या वाहतूक सेवेत दाखल आहे. भरवीर ते इगतपुरी या तिसऱ्या आणि इगतपुरी ते आमणे या चौथ्या टप्प्याचे काम सध्या वेगात सुरु आहे. विधानसभा निवडणुकीसाठीची आचारसंहिता लागू होण्याआधी हा शेवटचा टप्पा वाहतूक सेवेत दाखल करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. याला 'एमएसआरडीसी'चे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दुजोरा दिला.

**सप्टेंबरअखेरीस नागपुर - मुंबई प्रवास आठ तासात पार करणे शक्य**

समृद्धी महामार्ग ठाण्यातील आमणे येथे येऊन संपणार असला तरी आता पुढे हा महामार्ग मुंबई - वडोदरा महामार्गाला जोडण्यात येणार आहे. त्यानुसार इगतपुरी - शांग्रीला रिसॉर्ट, भिवंडी असा काही किमी लांबीच्या रस्त्याचेही काम 'एमएसआरडीसी' करीत आहे. त्यामुळे सप्टेंबरमध्ये इगतपुरी - आमणे आणि आमणे - शांग्रीला रिसॉर्ट, भिवंडी दरम्यानचा महामार्ग वाहतूक सेवेत दाखल होईल. त्यामुळे सप्टेंबरअखेरीस नागपुर - मुंबई प्रवास आठ तासात पार करणे शक्य होईल.



**शेवटच्या टप्पा सप्टेंबरपर्यंत प्रवाशांच्या सेवेत**

एमएसआरडीसीकडून इगतपुरी ते आमनेपर्यंत समृद्धी महामार्गाच्या शेवटच्या टप्प्याचीही कामे वेगाने सुरू आहेत. सध्या या मार्गावरील ९० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. हा मार्गही जुलैपर्यंत प्रवाशांच्या सेवेत दाखल करण्यात येणार आहे. त्यातून नागपूर ते मुंबई हा संपूर्ण प्रवास समृद्धी महामार्गावरून करणे वाहनांना शक्य होणार आहे. तर उर्वरित महामार्गाची कामे ऑगस्टपर्यंत पूर्ण करून तो वाहतुकीसाठी खुला केला जाणार आहे.

# पुणे हादरलं, सासवडमध्ये भर दुपारी गोळीबार, एसटीस्टँडसमोर थरार, नेमकं काय घडलं ?

**पुणे :** पुण्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून अनेक गुन्हेगारीच्या घटना घडत आहेत. पोर्षे हिट अँड रन प्रकरणानंतर एफसी रोडवर ड्रग्जचे सेवन करताना तरूणांचे व्हिडीओ व्हायरल झाले होते. विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यात दिवसाढवळ्या गुन्हेगारीच्या घटना होताना दिसत आहेत. आरोपींना पुणे पोलिसांचा धाक राहिला आहे की नाही असा प्रश्न नागिरक करत आहेत. पुणे शहरातील प्रकरणानंतर सासवडमध्ये गोळीबाराची धक्कादायक घटना समोर आली आहे. भर दिवसा झालेल्या गोळीबारामुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.



पुरंदर तालुक्यातील सासवड येथे एक गोळीबाराची घटना घडली. या गोळीबार मध्ये एक जण गंभीर रित्या जखमी झालाय. तर या संदर्भात स्थानिक आणि प्रत्यक्षदर्शी लोकांनी दिलेल्या माहितीनुसार सासवड येथील बस स्थानका समोर हा प्रकार घडला असून तीन हल्लेखोरांनी हा हल्ला केलाय. यावेळी एकावर गोळी झाडण्यात आलीय. गोळीबार यामध्ये ४१ वर्षीय राहुल नामदेव टिळेकर हे गंभीर रित्या जखमी झाले.


पुणे येथील एका रुग्णालयात उपचारासाठी राहुल टिळेकर यांना नेण्यात आलं आहे. सासवड एसटी बस स्थानकासमोर टिळेकर हे आईस्क्रीम विक्रीचा व्यवसाय करतात अशी प्राथमिक माहिती मिळतेय. दुपारी चार वाजलेच्या दरम्यान ही घटना घडलीय. घटना घडल्यानंतर सासवड पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून या संदर्भातील अधिकचा तपास सासवड पोलीस करत आहेत.

दरम्यान, राहुल टिळेकर यांच्यावर तीन हल्लेखोरांनी हल्ला केला. हल्ला केल्यावर तिथून ते पसार झाले असून पोलीस त्यांचा तपास करत आहेत. हा हल्ला कोणत्या कारणावरून झाला? फरार हल्लेखार कोण आहेत? याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

# श्रीलंका दौऱ्यासाठी टीम इंडियाचे शिलेदार ठरले

### सूर्याकडे टी २० चं तर वनडेमध्ये रोहित कर्णधार, गिल उपकर्णधार





**मुंबई :** श्रीलंका दौऱ्यासाठी टीम इंडियाच्या शिलेदारांची निवड करण्यात आली आहे. वनडे संघाची धुरा सूर्यकुमार यादव याच्या खांद्यावर सोपवण्यात आली आहे. तर वनडेचं कर्णधारपद रोहित शर्मा याच्याकडेच असेल. महत्वाचं म्हणजे, वनडे आणि टी२० संघाचं उपकर्णधार शुभमन गिल याच्याकडे सोपवण्यात आले आहे. हार्दिक पांड्या याच्याकडून उपकर्णधारपद काढून घेण्यात आले आहे.

भारत आणि श्रीलंका यांच्यामध्ये तीन सामन्याची वनडे आणि तीन सामन्याची टी२० मालिका होणार आहे. २७ जुलै ते ७ ऑगस्ट यादरम्यान टीम इंडिया श्रीलंकाविरोधात वनडे आणि टी२० मालिका खेळणार आहे. टी२० चे सर्व सामने पल्लेकेले येथे होणार आहेत, तर वनडे सामने कोलंबो येथील मैदानात होणार आहेत.

टी २० मालिकेसाठी टीम इंडिया - सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुभमन गिल (उपकर्णधार), यशस्वी जायस्वाल, रिंकु सिंह, रियान पराग, ऋषभ पंत (विकेटकीपर), संजू सॅमसन (विकेटकीपर), हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, रवि बिश्नोई, अर्शदीप सिंह, खलील अहमद, मोहम्मद सिराज

**वनडे मालिकेसाठी टीम इंडिया**

**रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल (उपकर्णधार), विराट कोहली, केएल राहुल (विकेटकीपर)ऋषभ पंत (विकेटकीपर),श्रेयस अय्यर, शिवम दुबे, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, वॉशिंगटन सुंदर, अर्शधीप सिंह, रियान पराग, अक्षर पटेल, खलील अहमद, हर्षित राणा**

दुसरा टी२० सामना - रविवार, २८ जुलै २०२४, रात्री सात वाजता, पल्लेकेले इंटरनेशनल क्रिकेट स्टेडियम

तिसरा टी२० सामना - मंगळवार, ३० जुलै २०२४, रात्री सात वाजता, पल्लेकेले इंटरनेशनल क्रिकेट स्टेडियम

**पहिला वनडे सामना - शुक्रवार, २ ऑगस्ट २०२४ - दुपारी २.३० वाजता - आर. प्रेमदासा स्टेडियम - कोलंबो**

**दुसरा वनडे सामना - रविवार, ४ ऑगस्ट २०२४ - दुपारी २.३० वाजता - आर. प्रेमदासा स्टेडियम - कोलंबो**

# महाळुंग येथे वारकऱ्यांच्या ट्रकचा अपघात, २० वारकरी जखमी

**अकलूज :** आषाढी एकादशीला विठुरायाचे दर्शन घेऊन परतीच्या प्रवासाला निघालेल्या वारकऱ्यांचा ट्रक (महाळुंग ता. माळशिरस) येथे रस्त्याकडेच्या चरिमध्ये पलटल्याने सुमारे २० वारकरी जखमी झाले आहेत. पुणे जिल्ह्यातील पाषाण येथील ट्रक क्रमांक एमएच १२ इओ ०७११ हा आज गुरुवार (दिनांक १८ जुलै) रोजी पंढरपूर येथून पुण्याच्या दिशेने निघाला असता, महाळुंग येथे रस्त्याच्या कडेला असलेल्या चरित पलटला.

या अपघातात प्रियांका सूरज डोळस (फुगेवाडी), अंकिता अंकुश मुसळे (पाषाण), सुमन संजय कारखानीस (पिंपळे गुरव), मारुती आनंदराव घुगे (पिंपळे गुरव), उषा नागनाथ कदम (लोणी काळभोर), ज्ञानबा अमोल कदम (लोणी काळभोर), रुक्मिणी पांडुरंग चांदणे लोणी काळभोर), विमल सदाशिव कोनवळे (वडगाव धायरी), गणेश रोहिदास शेलार (फुगेवाडी), रमेश प्रभाकर एरंडे (वडगाव धायरी), सुमन काशिनाथ कदम, सखुबाई अजिनाथ चिंचोळकर (वडगाव धायरी), सीता पोपट कदम (वडगाव धायरी), अंकुश मुरलीधर शिंगटे (वडगाव धायरी), तुकाराम शिंगटे (हडपसर), विमल महादेव कदम (गोकुळ नगर), नरहरी परमेश्वर गायकवाड (धायरी), वंदना भुजंग मेदाल (वडगाव धायरी), उज्वला सुनील रामखंडे (पिंपळे गुरव) सर्वजण राहणार पुणे हे वारकरी जखमी झाले आहेत. यांच्यावर अकलूज येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले.

# विशाळगडावर हिंसाचार झालेल्या भागाची अजित पवारांकडून पाहणी



**मुंबई :** अजित पवार यांनी विशाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या गावात आणि विशाळगडावरील अतिक्रमण झालेल्या भागाची पाहणी केली. तसेच ज्या अतिक्रमणावर प्रशासनाने कारवाई केली आहे त्याचीदेखील पाहणी केली. यावेळी अजित पवार यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला, त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. कोणाच्याही घरावर कारवाई होणार नाही, असं सांगत अजित पवारांनी ग्रामस्थांना आश्वस्त केलं. विशाळगडावर उसळलेल्या दंगलीप्रकरणी आरोपींवर कठोर कारवाई केली जाईल, असंही अजित पवार यावेळी म्हणाले. कोणीही कायदा व नियम हातात घेण्याचा प्रयत्न करू नये, अशा शब्दांत अजित पवारांनी सर्वांनाच खडसावलं.

अजित पवार म्हणाले, निष्पाप लोकांच्या घरांचं नुकसान झालं आहे. इथे राहणाऱ्या लोकांचा आणि अतिक्रमणाचा काहीही संबंध नव्हता. त्यामुळे नुकसानग्रस्तांना प्रशासनाच्या वतीने प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत केलेली आहे. संबंधितांवर योग्य ती कारवाई केली जाईल.

विशाळगडावरील अतिक्रमणाविरोधात माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी आंदोलन सुरू केलं होतं. या आंदोलनादरम्यान विशाळगडावरील वातावरण चिघळलं होतं. यावरून अजित पवार म्हणाले, संभाजीराजेंबरोबर आम्ही बैठक घ्यायला तयार होतो. चर्चेतून मार्ग काढला जातो. छत्रपती शिवाजी महाराजांबरोबरही सगळ्या जाती-धर्मांचे लोक होते. संभाजीराजेंनी देखील धीराने घ्यायला पाहिजे होतं. आता ते सरकारवर टीका करत आहेत,

# आरक्षण वादाला सत्ताधाऱ्यांकडूनच खतपाणी

# शरद पवार यांची टीका

**पुणे :** सत्ताधारी पक्षाचे नेतेच आरक्षणाच्या वादाला खतपाणी घालणारी विधाने करीत असून, आम्हालाच ते अस्वस्थता थांबविण्याचे आवाहन करीत आहेत, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली. तसेच विधानसभा निवडणुकीतही लोक योग्य तो निर्णय घेतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या इमारतीत उभ्या केलेल्या स्टुडीओचे उदघाटन पवार यांच्या हस्ते झाले. यानंतर वार्तालापात पवार यांनी राज्यातील राजकीय परस्थिती, आरक्षणासह विविध विषयांवर दिलखुलास मते मांडली.

आरक्षणाच्या मुद्यावरून आंदोलन करणारे मनोज जरांगे आणि लक्ष्मण हाके यांना मुख्यमंत्र्यांसह सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी काय शब्द दिले आहेत, ते आधी जाहीर करावे, असे आवाहन पवार यांनी केले. राज्यात आरक्षणाचा वाद सुरु आहे, त्यापार्श्वभूमीवर दोन दिवसांपूर्वी छगन भुजबळ यांनी पवार यांची भेट घेऊन मध्यस्थी करण्याची विनंती केली होती. त्यावर पवार यांना विचारले असता ते म्हणाले, की बारामती- बीड अशा राज्यात तीन दोन ते तीन ठिकाणी भुजबळ यांच्या सभा झाल्या. त्या सभांमध्ये त्यांची भाषणे चांगली झाली, माझ्याबद्दल त्यांनी आस्था व्यक्त केली. ते माझ्याकडे आले, दीड तास थांबलेही. दोन चार गोष्टी सांगितल्या. महाराष्ट्र शांत होण्यासाठी पुढाकार घ्या.

जातीवाद वाढायला यांची वक्तव्ये कारणीभूत ठरली.



राज्यकर्त्यांनी वाद मिटविण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा होता. आम्हाला बाजूला ठेऊन निर्णय घेतले आणि आता शांतता प्रस्थापित करण्यासाठी शरद पवार यांची गरज असल्याचे म्हणत आहेत, असेही पवार यावेळी म्हणाले. सत्ताधाऱ्यांची मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे आणि ओबीसी आंदोलनाचे नेते लक्ष्मण हाके या आंदोलनकर्त्यांबरोबर त्यांची काय चर्चा झाली, त्यांनी काय आश्वासने दिली, याची कोणतीही कल्पना आम्हाला दिलेली नाही,

# विशाळगड दंगलीमागे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हात

## ठाकरे गटाचा आरोप

**कोल्हापूर** : विशाळगडावरील दंगल ही राज्य सरकार, जिल्हा प्रशासन, पोलीस यांच्या सत्तेच्या राजकारणासाठी केलेला हा पूर्वनियोजित कट असून या दंगलीमागे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हात असल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाने केला. तसेच त्यांची निवृत्त न्यायाधीशांमार्फत चौकशी करावी, अशी मागणीही शिष्टमंडळाने केली

यावेळी ठाकरे गटाच्यावतीने पितळी गणपती मंदिर ते पोलीस महानिरीक्षक कार्यालयपर्यंत मोर्चा काढत राज्य सरकारविरोधात जोरदार घोषणा दिल्या.मागणीचे निवेदन पोलीस उपाधीक्षक शशिराज पाटोळे यांना दिले. विशाळगड अतिक्रमण मुक्त व्हावं ही सर्वांची इच्छा आहे मात्र ही दंगल होण्यापूर्वी अतिक्रमण काढता आलं असतं मात्र राज्य शासनाने हे केलं नाही शिवाय पोलीस प्रशासन जिल्हा प्रशासन देखील शांत बसले. भाजप सरकारला लोकसभा निवडणुकीमध्ये चांगला फटका बसला आहे त्यामुळे कोल्हापूरला टार्गेट केलं जात असून भाजपचा हा डाव आम्ही कधीच यशस्वी होऊन देणार नसल्याचे ठाकरे गटाचे उपगट नेते संजय पवार यांनी सांगितले.

यावेळी ठाकरे गटाचे सह संपर्क प्रमुख विजय देवने, जिल्हा प्रमुख सुनील शिंत्रे,संजय चौगले, माजी आमदार सुजित मिणचेकर, उल्हास पाटील शहरप्रमुख रविकिरण इंगवले,हर्षल सुर्वे, वैभव उगळे, संभाजी भोकरे, अवधूत साळोखे, पोपट दांगट, संदीप दबडे, सागर साळोखे, हर्षल पाटील, प्रतिज्ञा उतुरे, स्मिता सावंत, पूनम फडतरे, प्रेरणा बाकले यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# कोल्हापुरातून सद्भावना यात्रेतून संदेश : विशाळगड प्रकरण

## सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न आम्ही हाणून पाडू



**कोल्हापूर :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांची कास धरुन गुण्यागोविंदाने राहणाऱ्या करवीर नगरीत सामाजिक सलोखा बिघडविण्याचा कितीही प्रयत्न झाला तरी आम्ही विचलित होणार नाही, तर प्रतिगाम्यांचे हे प्रयत्न अधिक ताकदीने हाणून पाडू, असा संदेश देत कोल्हापुरातील सर्वधर्मियांनी शिव-शाहू सद्भावना यात्रा काढून एकीचे दर्शन घडविले.

या यात्रेचे नेतृत्व खासदार शाहू छत्रपती, विधान परिषदेतील कॉंग्रेसचे गटनेते आमदार सतेज पाटील, आमदार जयश्री जाधव, माजी आमदार मालोजीराजे छत्रपती यांच्यासह पुरोगामी कार्यकर्त्यांनी केले. सर्वधर्मिय समुदाय सद्भावना यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाला होता.

नर्सरी बागेतील राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्मारकापासून सुरु झालेली ही सद्भावना यात्रा चिमासाहेब महाराज चौक, सीपीआर चौक, भाऊसिंगची रोड, महापालिकामार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहचली. तेथे या सद्भावना यात्रेची सांगता झाली. ही यात्रा मुक होती, त्यामुळे कसल्याही प्रकारच्या घोषणा देण्यात आल्या नाहीत. यात्रेत तिरंगा ध्वज, संविधानाची प्रत, राष्ट्रपुरुषांचे फलक पहायला मिळाले.

# बेदाणा उधळनीतून शेतकऱ्यांची लूट थांबवा: अमोल काळे

### सौदे बंद पाडण्याचा इशारा, जिल्हा उपनिबंधकांना मनसेचे निवेदन

तासगाव : तासगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत बेदाणा उधळण करून अडते व व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात लूट सुरू आहे. त्यांच्यावर कारवाई करा अन्यथा सौडे बंद पाडून तीव्र आंदोलनाचा इशारा मनसे नेते अमोल काळे यांनी दिला आहे जिल्हा उपनिबंधक यांना त्यांनी या संबंधी निवेदन दिले आहे.

दिलेल्या निवेदनात त्यांनी सांगितले की वरील विषयास अनुसरून तासगाव येथे होत असलेल्या बेदाणा सौद्यात शेतकऱ्यांच्या बेदाण्याची उधळण होत आहे. या उधळणीतून शेतकऱ्यांची अडत्यांनकडून वर्षाकाठी सुमारे दहा कोटींची लुट केली जात आहे. वर्षाला सुमारे एक हजार टन बेदाण्याची उधळण होते. यातून अडत्यांचा कोट्यावधी रुपये कमवण्याचा कारभार चालू आहे. शेतकऱ्यांनी लाखो रुपये खर्च करून तयार केलेला बेदाणा सौद्यामध्ये उधळून तो पायाखाली तुडवला जातो.

१५ किलोच्या बेदानाच्या बॉक्समधून सरासरी ३ किलो बेदाण्याची उधळण केली जाते. सौद्यात हवा तो दर नाही मिळाला तर पुन्हा पुढच्या सौद्यावेळी अशीच मालाची उधळण केली जाते. संपूर्ण हंगामात सुमारे तीन ते चार हजार कलमांचा सौदा होतो, जितकी कलमे तितके बॉक्स फोडून मालाची उधळण होते. सौद्यानंतर खाली पडलेला बेदाणा अडतेच गोळा करातात. हंगामात एका सौद्यात सुमारे १०० टनापर्यंत उधळण केलेला बेदाणा खाली पडलेला असतो, असे वर्षभरात १२० ते १३० सौदे होतात वर्षाला तब्बल एक हजार टन बेदाण्याची उधळण होते. उधळण झालेला बेदाणा अडते स्वतः ताब्यात घेऊन, पॉलिश करून तो पुन्हा विकतात हा बेदाणा किमान १०० रु. प्रतिकिलो जरी विकला गेला, तरी सुमारे दहा कोटी पर्यंत फायदा अडत व्यापाऱ्यांचा होतो, दीपावळीमध्ये हा माल विकायला काढला जातो.

यातूनच कामगारांना बोनस, उचल दिल्या जातात. खुलेआम बेदाणा उत्पादकांची लुट होत असताना, बाजार समितीचे पदाधिकारी आणि प्रशासन सोयीस्कर कानाडोळा करत आहे. अशा प्रकारे बेसुमारपणे बेदाणा उत्पादकांची लुट होत आहे, याला आळा बसने गरजेचे आहे.

बेदाणा मार्केटमध्ये शेतकऱ्यांना प्रक्रियेपासून ते विक्रीपर्यंत अडते, व्यापारी व खरेदीदारांची साखळी तयार झाली आहे. याच साखळीतून शेतकऱ्यांची पिळवणूक होत आहे. शेतकऱ्यांना ॲडव्हान्स दिलेल्या रक्कमेवर सावकारी पद्धतीने व्याज आकारले जात आहे. असे सर्व मिळून सुमारे दोनशे कोटींपेक्षा जास्त रक्कमा देऊन त्यावर दोन टक्के व्याजाची आकारणी करून रक्कम वसूल केली जाते. यातून शेतकऱ्यांची कोट्यावधी रुपयांची लुट व्यापाऱ्यांकडून केली जात आहे. या साखळीमुळे जिल्ह्यातील बेदाणा उत्पादकांना चांगले दिवस येणे तर लांबच दिवसेंदिवस त्यांची परिस्थिती बिगडतच चालली आहे तसेच शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. याउलट शेतकऱ्यांच्या जीवावर या व्यापाऱ्यांची घरभरणी सुरु आहे.

तरी या सर्व प्रकाराची गांभीर्याने दखल घेऊन शेतकऱ्यांची पिळवणूक थांबवण्यासाठी योग्य ते निर्णय लवकरात लवकर घ्यावेत ही विनंती, अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल तसेच तासगांव मध्ये होणारे सौदे बंद पाडण्यात येतील. त्यातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास आपण जबाबदार असाल असा इशारा देण्यात आला आहे.



# रिपाइं पुणे शहराच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**हडपसर/ पुणे :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त सारसबाग येथील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट पुणे शहराच्या वतीने पुणे शहर अध्यक्ष संजय सोनवणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .

यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पश्चिम महाराष्ट्राचे वरिष्ठ उपाध्यक्ष विशाल शेवाळे, बाळासाहेब जानराव, पुणे शहराचे माजी अध्यक्ष महेंद्र कांबळे, बसवराज गायकवाड, निलेश अल्हाट, बाबुराव घाडगे, वीरेन साठे, महादेव दंदी, भगवान गायकवाड, शाम सदाफुले, जितेंद्र गायकवाड, अंबादास कोतले, संतोष खरात, अमोल खंडाळे, सुनील जाधव, खंडू शिंदे, अविनाश गायकवाड, अतुल भालेराव, शांतिनाथ चव्हाण, राजेश गाडे ,शशिकांत मोरे, रोहित कांबळे, अरविंद शिंदे, दत्ता चव्हाण, गोविंद

# जुन्या योजना नव्या घोषणा: महायुतीकडून जनतेची दिशाभूल

**मुंबई :** राज्य सरकार महिला किंवा युवकांच्या भल्यासाठी काहीही करत नसून विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर जुन्याच योजना नव्या नावाने पुढे आणून जनतेची फसवणूक करण्याचे उद्योग करीत आहे, असा आरोप विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी पत्रकारांशी बोलताना केला.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेला मिळालेल्या प्रचंड प्रतिसादानंतर राज्य सरकारने मुख्यमंत्री माझा लाडका भाऊ ही योजना सादर केली आहे. मात्र, या योजनेत काहीही नवीन नाही. ही योजना तब्बल पन्नास वर्षांपूर्वीची म्हणजेच सन १९७४ मध्येच राबवण्यात आलेली योजना आहे. त्याचेच नाव बदलून लाडका भाऊ योजनेच्या नावाखाली ही योजना नव्याने राबवत असल्याचा. आव राज्य सरकार आणत आहे, अशी टीका दानवे यांनी केली. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सरकारला लाडकी बहीण आणि लाडके भाऊ आठवत आहेत. प्रत्यक्षात या योजना जुन्याच आहीं. विधानसभेच्या निवडणुका तोंडावर आलेले असताना हे सरकार युवकांना भुलथापा देत आहे.

# समर्थ सदनमध्ये चातुर्मास उपक्रमाला प्रारंभ



**सातारा :** येथील श्री संत ज्ञानपीठ अर्थात श्री समर्थ सदन सांस्कृतिक केंद्रात सज्जनगड येथील श्री समर्थ सेवा मंडळाच्या वतीने आषाढी एकादशी ते कार्तिकी एकादशी दरम्यान चातुर्मास उपक्रमांतर्गत कार्यक्रमांना प्रारंभ झाला.श्री समर्थ सेवा मंडळाचे कार्यवाह समर्थ भक्त योगेश बुवा रामदासी ,कार्याध्यक्ष डॉ. अच्युत गोडबोले,समर्थ विद्यापीठाचे कुलपती समर्थ भक्त रमेशबुवा शेंबेकर, नागपूर येथील ज्येष्ठ समर्थभक्त व कीर्तनकार शाम बुवा धुमकेकर तसेच मंडळाचे सदनचे व्यवस्थापक प्रवीणबुवा कुलकर्णी ,राजू कुलकर्णी ,संतोष वाघ, रवीबुवा आचार्य, हार्मोनियम वादक बाळासाहेब चव्हाण ,तबलावादक विश्वनाथ पुरोहित आदी मान्यवरांच्या उपस्थितीत या उपक्रमाचा प्रारंभ मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलाने झाला.

यावेळी आपल्या प्रास्ताविक भाषणात बोलताना समर्थ भक्त योगेश बुवा रामदासी म्हणाले की ,समर्थ सेवा मंडळाच्या वतीने चातुर्मास उपक्रमांतर्गत विविध मान्यवर कीर्तनकार प्रवचनकार तसेच व्याख्यात्यांची ही खऱ्या अर्थाने एक आगळीवेगळी पर्वणी सातारकरांना मिळत आहे .गेली अनेक वर्ष हा उपक्रम सातत्याने सुरू असून या उपक्रमासाठी आपल्या सर्वांचे तन-मन-धन आणि प्रोत्साहन महत्त्वाचे आहे .आपण या कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित रहात आहात, याचबरोबर या उपक्रमाबाबतची माहिती आपण इतरांना देऊन त्यांना आवर्जून अशा अवर्णनीय श्रवणाचा आनंद घेण्यासाठी हट्ट करावा असे आवाहन केले .

यावेळी समर्थ सेवा मंडळाच्या वतीने कीर्तनकार शाम बुवा धुमकेकर यांचा सत्कार करण्यात आला .तीन दिवसीय कीर्तन मालेमध्ये पहिल्या दिवशी श्याम बुवा धुमकेकर यांनी ..पंढरीसी जारे सोडुनी संसारा ,दिनांचा सोयरा पांडुरंग.. हा ज्येष्ठ संत तुकाराम महाराज यांचा अभंग पूर्व रंगासाठी घेतला होता. पंढरीचे महात्म्य वर्णन करताना देह हीच पंढरी असून त्यात आत्मा हा पुंडलिक आहे. आणि मन हे पुंडलिक आहे. भावभक्तीची भीमा आणि चंद्रभागा वाहत असताना घरी बसूनच आपण पंढरीला न जाताना या पंढरीचे अवर्णनीय सुख मिळवू शकतो याबाबत सुरेख विवेचन केले .तसेच उत्तर रंगात संत सावता माळी यांचे चरित्र वर्णन केले .दुसऱ्या दिवशी संतांचे सर्वस्व पांडुरंग असल्याचे आपल्या पूर्व रंगात उपस्थिताना अनेक दाखल्यातून सांगताना प्रसिद्ध कानडी संत पुरंदर दास यांचे चरित्र सांगितले.

हा उपक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून समर्थ सदन येथे या पुढील कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मंडळाचे सदनचे व्यवस्थापक राजू उर्फ मुरलीधर कुलकर्णी यांनी केले आहे.

या उपक्रमांतर्गत दि.२० जुलै आणि दि.२१ जुलैला सज्जनगड येथील समर्थ भक्त अजेयबुवा देशपांडे रामदासी यांचे प्रवचन होणार आहे. दि.२२ व दि.२३ जुलैला संदीपबुवा मांडके पुणे यांचे कीर्तन होणार आहे .तर दि.२४ जुलै ते दि.२५ जुलै धाराशिव येथील समर्थभक्त पद्मनाभ व्यास यांचे प्रवचन होणार आहे .दि.२६ व दि.२७ जुलैला डोंबिवली मुंबई येथील समर्थ भक्त सौ. अलकाताई मुतालिक यांचे प्रवचन होणार आहे .दि.२८ व दि.२९ जुलैला संगमेश्वर येथील समर्थ भक्त महेश वाघ आणि यांचे कीर्तन होणार आहे .दि.३० जुलै रोजी वाशी नवी मुंबई येथील सौ. रसिकाताई ताम्हणकर यांचे प्रवचन होणार असून दि. ३१ जुलैला ठाणे येथील अरुंधती उकिडवे यांचे प्रवचन होणार आहे.

उपक्रमांतर्गत सर्व कीर्तन कार्यक्रमांसाठी संवादिनीवर साथ बाळासाहेब चव्हाण यांची असून, तबला साथ विश्वनाथ पुरोहित हे करणार आहेत .या सर्व कार्यक्रमांना प्रवेश विनामूल्य असून या कार्यक्रमास मोठ्या संख्येने सातारकरांनी उपस्थित राहून चातुर्मासाचा हा कार्यक्रम यशस्वी पार पाडावा असे आवाहन मंडळाचे वतीने कार्यवाह समर्थ भक्त योगेशबुवा रामदासी ,कार्याध्यक्ष गोडबोले व मंडळाचे अध्यक्ष समर्थ भक्त गुरुनाथ महाराज कोटणीस यांनी केले आहे. तसेच हे सर्व कार्यक्रम समर्थ सदनचे व्यवस्थापक प्रवीण कुलकर्णी गुरुजी ,मुरलीधर उर्फ राजू कुलकर्णी सौ .कल्पना ताडे ,राजाभाऊ कुलकर्णी ,रवीबुवा आचार्य , देसाई वहिनी आदी सहकार्यांच्या विशेष परीश्रमातून संपन्न होत आहेत.

# विशाळगडाजवळच्या गजापूर गावातील नासधूस हा पूर्वनियोजित कट; शरद पवार गटाच्या नेत्याचा थेट आरोप आरोप

**कोल्हापुर** : कोल्हापुरातील विशाळगडाच्या पायथ्याशी एक घटना घडली अन् त्याचे पडसाद महाराष्ट्रासह देशभर उमटले. विशाळगडापासून तीन किलोमीटर अंतरावर असणाऱ्या गजापूर गावातील घरांवर अचानकपणे हल्ला करण्यात आला. यात स्थानिकांच्या घरांचं- रोजच्या वापरातील वस्तूंचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. या सगळ्यावर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी भाष्य केलं आहे. गडापूरवरचा हल्ला हा पूर्वनियोजित कट होता. तिथे जाऊन दंगा - गोंधळ करायचं हे ठरलेलं असावं. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी केली पाहिजे, असं जयंत पाटील म्हणाले

अतिक्रमणाला विरोध नाही, पण




विशाळगडावरील अतिक्रमण दूर करावं, यासाठी अनेक शिवप्रेमी हे बराच काळ मागणी करत होते. तिथलं अतिक्रमण पावसाळ्याच्या अगोदर दूर करणे गरजेचं होतं. आता ऐन पावसात तिथल्या लोकांना कुठे हलवायचं, हा एक मोठा प्रश्न आहे. यावर काही लोकांनी कोर्टातून स्टे आणला होता. त्यामुळे तिथल्या १२-१३ घरांना काढणं शक्य नव्हतं, मात्र उरलेल्यांना काढावं असे आदेश आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेले आहेत. पावसाळ्यात अशा लोकांना तिथून काढून टाकणं हे योग्य नाही. मात्र अतिक्रमाणाला आमचा पाठिंबा नाही, असंही जयंत पाटील म्हणाले.

विशाळगडावरचं अतिक्रमण हे दूर झालंच पाहिजे, याबद्दल कोणतीही शंका नाही. अतिक्रमण काढण्यासाठी जे पायथ्याशी लोक आले त्यांनी तिथल्या नजदीकच्या गावामध्ये जाऊन मुस्लिम वस्तीवर हल्ला करणं. त्यांच्या घरांची नासधूस करणं, तिजोऱ्या फोडणं आणि मालमत्ता लुटणं हे छत्रपती शिवाजी महाराजांना देखील अपेक्षित नव्हतं, असं जयंत पाटलांनी म्हटलं.

**हा तर पूर्वनियोजित कट**

लोकांच्या घरावर हल्ला करण्याचं काम शिवप्रेमी करू शकत नाहीत. त्यामुळे त्या सर्वांवर कारवाई झाली पाहिजे. त्यांच्यावर कलम १५३ आणि अधिक कडक कलम लावली पाहिजेत. काळ सोकावू नये अशी आमची अपेक्षा आहे. पोलीस यामध्ये जनतेला संरक्षण देण्याबाबतीत अपयशी ठरले.

# रेल्वे अपघातात चौघांचा मृत्यू



**उत्तर प्रदेश** : उत्तर प्रदेशातील गोंडा जिल्ह्यात आज एक मोठा रेल्वे अपघात झाला आहे. आज दुपारी ३ वाजेच्या सुमारास डिब्रूगढ़ एक्सप्रेस (१५९०४)चे सुमारे १२ डब्बे रुळावरून घसरले. ही एक्सप्रेस चंदीगडवरून डिब्रुगढला जात होती. तेव्हा हा अपघात झाला. झिलाही आणि मोतीगंज रेल्वे स्थानकाच्या तीन किलोमीटरच्या दरम्यान हा अपघात झाला. या अपघातात चौघांचा मृत्यू झाला असून २७ प्रवाशी जखमी झाले आहेत. या जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अफघाताची माहिती मिळताच रेल्वेचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी आले असून बचावकार्य सुरू आहे.

चंदीगडहून ही ट्रेन निघाली होती. गोंडापासून २० किलोमीटर अंतरावर हा अपघात झाला. दोन बोगी रुळावरून उतरल्या. त्यामुळे रुळ उखडली गेली. हा अपघात झाल्याने अनेकजण भयभीत झाले. गाडीतील सामान भराभरा अंगावर पडल्याने कुणाच्या डोक्याल, कुणाच्या हाताला तर कुणाच्या पायाला जबर मार लागला. काहींच्या बॅगा हरवल्या तर काहींच्या सुटकेस मिळेनाशा झाल्या. अपघात होताच प्रवाशांनी एकच आक्रोश केला. आपण जगू की नाही? असं त्यांना सुरवातीला वाटलं. पण सुदैवाने चार प्रवासी वगळता सर्वांचे प्राण वाचले. या अपघातात २७ जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

मुख्यमंत्र्यांचे आदेश

दरम्यान, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या अपघाताची माहिती घेतली असून तात्काळ रुग्णांवर उपचार करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच रेल्वे पूर्ववत सुरू करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांनाही या घटनेची माहिती देण्यात आली आहे. आसाम सरकार आणि उत्तर प्रदेश सरकार एकमेकांच्या संपर्कात असून प्रवाशांसाठी सर्वोतोपरी सहकार्य करत असल्याचं सूत्रांनी सांगितलं.

**काचा फोडून प्रवासी बाहेर**

या अपघाताचे फोटो व्हायरल झाले आहेत. त्यात अपघाताची परिस्थिती दिसून येते. एक्सप्रेसचे कोच पलटी झाले आहे. दोन्ही कोच एसी आहेत. या डब्ब्यातील प्रवाशांना बाहेर काढण्याचं काम सुरू आहे. या अपघातातील मृतांची संख्या वाढण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज प्रदर्शनाचे उद्घाटन : शिवभक्तांना घेता येणार वाघनखांचे दर्शन






**सातारा :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्ष सोहळ्यानिमित्त; सातारा येथील श्री छत्रपती शिवछत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात, इंग्लंड मधील व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट वस्तुसंग्रहालयातून आणलेली वाघनखे, शिवभक्तांना दर्शनासाठी दिनांक १९ जुलैपासून उपलब्ध होणार आहेत, अशी माहिती पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालयाचे संचालक सुजितकुमार उगले यांनी दिली आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, पालकमंत्री शंभूराज देसाई, श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले, श्रीमंत संभाजीराजे छत्रपती व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत शस्त्र प्रदर्शन उद्घाटन सोहळा होणार असल्याचे त्यांनी पुढे नमूद केले आहे

खडतर अशा परीक्षेतून व अग्नी दिव्यातून ही वाघनखे इंग्लंड मधून भारतात येत आहेत. कारण गेले वर्षभर ही वाघनखे आणण्यासाठी विविध प्रक्रिया सांस्कृतिक कार्य विभागामार्फत सुरू होत्या. सातारा येथील वस्तुसंग्रहालयात दिनांक १९

## शिवशस्त्रशौर्यगाथा या शिवकालीन शस्त्र प्रदर्शनामध्ये शिवभक्तांना घेता येणार

### हे पाहता येणार..

**ऐतिहासिक 'वाघनखे' हे प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण असणार आहे. त्याचबरोबरच नागरिकांना शिवकालीन शस्त्र, वस्त्र, नाणी, तलवारी, बंदुका, भाल्यांचे विविध प्रकार, पट्टे, कुऱ्हाडी, कट्यारी, बाण, गदा यासह इतर दुर्मिळ वस्तू पहावयास मिळणार आहेत.**

जुलैपासून होणाऱ्या शिवशस्त्रशौर्यगाथा या शिवकालीन शस्त्र प्रदर्शनामध्ये, या वाघनखांचे दर्शन घेता येईल.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी ज्या वाघनखांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला ती वाघनखे बुधवारी साताऱ्यात दाखल झाली. छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालयात ही वाखनखे ठेवण्यात आली असून, जिल्हा प्रशासनाकडून सुरक्षेची पुरेपूर खबरदारी घेण्यात आली आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

लंडन येथील व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियममध्ये असलेली ही वाघनखे बुधवारी सकाळी विशेष विमानाने महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईत दाखल झाली. सर्व सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर कडेकोट पोलिस बंदोबस्तात या वाघनखांचा स्वराज्याची चौथी राजधानी असलेल्या साताऱ्याच्या दिशेने प्रवास सुरू झाला. एका टेम्पोतून ही वाघनखे साताऱ्यातील वस्तु संग्रहालयात सुरक्षित आणण्यात आली. या वाघनखांसह 'शिवशस्त्रशौर्यगाथा' या शिवकालीन शस्त्रांच्या प्रदर्शनाचे शुक्रवारी (दि. १९) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते उद्घाटन केले जाणार आहे. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री शंभूराज देसाई, खासदार उदयनराजे भोसले, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

शनिवारपासून (दि. २०) हे प्रदर्शन सर्व नागरिकांना पाहण्यासाठी खुले करण्यात येणार आहे. वाघनखे सात महिने सातारा येथील संग्रहालयात सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत नागरिकांना पाहण्यासाठी खुले राहील. याची तिकिटे ऑनलाईन आणि ऑफलाइन अशा दोन्ही पद्धतीने नागरिकांना उपलब्ध करून घेता येतील. हे प्रदर्शन एकावेळी दोनशे लोकांना पाहता येतील येईल.

## / गुन्हे वृत्त... /

### देशी दारू विक्री प्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** ठोसेघर ता.सातारा येथे देशी दारु विक्री प्रकरणी किसन रामचंद्र बेडेकर (वय ६३, रा. ठोसेघर ता.सातारा) याच्या विरुध्द सातारा तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी त्याच्याकडून १४०० रुपये किंमतीच्या २० बाटल्या जप्त केल्या आहेत.

### कॅलेडर विक्रीत फसवणूक एकावर गुन्हा

**सातारा :** कॅलेन्डर घेवून त्याचे पैसे न देता ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी संदीप वसंत प्रभाळे (मूळ रा.पसरणी ता.वाई सध्या रा.सातारा) याच्या विरुध्द सातारा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी संजय बबन पोतदार (वय ५८, रा. पंताचा गोट, सातारा) यांनी तक्रार दिली आहे. ही घटना २३ डिसेंबर २०२३ रोजी घडली आहे.

### छेडछाडीच्या त्रासाने शाहूपुरीत अल्पवयीन मुलीची आत्महत्या

**सातारा :** शाहूपुरी येथे अल्पवयीन मुलीने केलेल्या आत्महत्येचे कारण समोर आले आहे . तिची छेडछाड काढून पाठलाग होत असल्याने या सर्व त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याची तक्रार तिच्या भावाने पोलिस ठाण्यात दिली. सुभाष बाबूराव शिंदे (वय ४२, रा. शाहूपुरी, सातारा) असे संशयित आरोपीचे नाव आहे.

अथर्व सदानंद इंगळे (वय २०, रा. शाहूपुरी) या युवकाने पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून मृत अदितीचा तो भाउ आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, ही घटना १ एप्रिल ते १० जुलै या कालावधीत घडलेली आहे. संशयित सुभाष शिंदे हा अल्पवयीन मुलीला मोबाईलवर वारंवार मेसेज करत होता. तसेच व्हॉट्सअपवर मेसेज करुन छेड काढत होता. संशयिताने मुलीला आय लव्ह यू असा मेसेज टाकून तिचा पाठलग करत होता. मेसेजला उत्तर दिले नाहीतर तो मेसेज मुलीच्या मित्रांना दाखवण्याची धमकी दिली. अशाप्रकारे वारंवार मानसिक त्रास संशयित देत होता. तसेच घरी येवूनही संशयिताने चौकशी केल्याने मुलगी असाह्य झाली. या कारणातूनच अदितीने १० जुलै रोजी राहते घरी फॅनला गळफास घेवून आत्महत्या केली.

### अल्पवयीन मुलीचे साताऱ्यात अपहरण

**सातारा :** सातारा शहर परिसरातून अज्ञाताने १६ वर्षीय मुलीचे अपहरण केले असून शाहूपुरी पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. मुलीच्या आईने पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. ही घटना दि. १५ जुलै रोजी घडली आहे.

### जमीन विक्री व्यवहारात फसवणूक प्रकरणी दोघांवर गुन्हा

**सातारा :** जमीन स्वत:च्या मालकीची असल्याचा बनाव करुन त्याचा व्यवहार करत १ लाख ७४ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी सुरेश चव्हाण व वैशाली चव्हाण (दोघे रा. संगमनगर, सातारा) यांच्या विरुध्द सातारा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

विद्या राहूल कावरे (वय ३४, रा. मुंबई) यांनी सातारा शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. याबाबत अधिक माहिती अशी, ही घटना डिसेंबर २०१७ ते २०१९ या कालावधीत घडली आहे.

सहकारनगर, सातारा येथे दोन गुंठ्याचा त्यांचा प्लॉट असल्याचे चव्हाण यांनी कावरे यांना दाखवले होते. त्याच्या व्यवहार म्हणून ८ लाख २० हजार रुपयांची रक्कम ठरली. दस्त करताना शासनाची परवानगी घेतली आहे, असे चव्हाण यांनी दाखवले. त्यानुसार तक्रारदार कावरे यांनी पैसे दिले. मात्र जमीनीचा ताबा न दिल्याने तक्रारदार यांनी पैसे परत देण्याचा तगादा लावला. संशयित चव्हाण यांनी ६ लाख ४६ हजार रुपये दिले. मात्र उर्वरीत १ लाख ७४ हजार रुपये न देता त्यास टाळाटाळ केली. फसवणूक झाल्याचे समोर आल्याने तक्रारदार कावरे यांनी सातारा शहर पोलिस ठाण्यात फसवणूकीची तक्रार दिली.

### ६ लाखांची फसवणूक

**कोरेगाव :** रहिमतपूर येथील ऊस वाहतूक ट्रॅक्टर मालकाचा विश्वास संपादन करुन सन २०२३ उसतोड हंगामाकरीता ८ उस तोड मजुर पुरवतो असे सांगून २० मार्च ते १६ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत ऑनलाईन व रोख स्वरुपात एकूण ६,०८,०००/- घेतली, मात्र प्रत्यक्षात आज पर्यंत मजूर न पुरवता अथवा घेतलेले पैसे मला परत दिले नसल्याने फसवणूक केल्याप्रकरणी ऊसतोड कामगार दाजीबा दगडोबा भोंगदळ राहणार हादगाव तालुका पाथरी जिल्हा परभणी याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी विलास गुलाबराव माने यांनी रहिमतपूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

रहिमतपूर येथील विलास उर्फ महेश माने यांच्या मालकीचा न्यू हॉलंड कंपणीचा ट्रॅक्टर एम.एच. ११बी झेड २१३ असून ट्रैक्टर ऊस वाहतुकी करने करिता जरंडेश्वर कारखाण्यास करारावर लावत असतात. त्या दरम्यान सन- २०२३ मध्ये ऊस तोड कामगार दाजीबा दगडोबा भोगदळ रा. हादगाव ता. पाथरी जि. परभणी यांच्याशी ओळख झाली. परिचय दृढ झाल्यानंतर ऊसतोड ठेकेदार दाजीबा भोंगदळ याने ८ मजुर पुरवतो असे सांगितले. रहिमतपुरचे माजी नगराध्यक्ष अविनाश माने यांचे घरी मजुरांचे करार करणेबाबत बैठक झाली. त्यावेळी रामेश्वर कुंडलीक वाण रा. रहिमतपुर हे ही हजर होते. दाजीबा दगडोबा भोंगदळ यास ऊस तोड ८ मजूर ६,०५,०००/- मध्ये एक वर्षाच्या करारावरती तोडणी वर्ष २०२३ करीता देण्याचे ठरवले व एका वर्षातील ऊस तोड करून सदर रक्कम फेड करण्याबाबत ठरले व त्यानुसार नोटरी पद्धतीने रजिस्टर करण्यात आले. दि. २० मार्च ते १८ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत ऑनलाईन व रोख स्वरुपात एकूण ६,०८,०००/- देण्यात आले, मात्र प्रत्यक्षात संबंधित ऊसतोड कामगार तथा ठेकेदार दाजीबा भोंगदळ याने आज पर्यंत मजूर न पुरवता अथवा घेतलेले पैसे मला परत न देता फसवणूक केल्याची फिर्याद रहिमतपूर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली.

## योगेश टिळेकर यांची विधानपरिषदेवर आमदार पदी निवड झाल्याने महंमदवाडीत जंगी स्वागत



**हडपसर :** महाराष्ट्र विधानपरिषदेवर आमदार योगेश टिळेकर यांची आमदार पदी निवड झाल्याने महंमदवाडी ग्रामस्थांच्या वतीने योगेशआण्णा टिळेकर यांची भव्य मिरवणूक काढून त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

भाजप पुणे शहर महिला आघाडी उपाध्यक्ष स्वातीताई प्रमोद कुरणे यांनी नवनिर्वाचित आमदार योगेश टिळेकर यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. विधानपरिषद महाराष्ट्र राज्य आमदारपदी निवड झाल्याबद्दल मोठ्या जल्लोषात महंमदवाडीत त्यांचे जंगी स्वागत व सत्कार करण्यात आला.

यावेळी पुणे शहर उपाध्यक्ष स्वातीताई कुरणे, भाजप युवा मोर्चा हडपसर अध्यक्ष बाळासाहेब घुले,संतोष भानगिरे, कलेश्वर घुले, प्रमोद सातव, मनोज घुले, योगेश सूर्यवंशी, अभिमन्यू भानगिरे, महेश घुले, नंदू कुरणे ,गोरख घुले, संदीप आल्हाट, राहुल घुले, तसेच भाजपाचे आणि महायुतीचे पदाधिकारी, महंमदवाडी ग्रामस्थ महिला वर्ग, युवा वर्ग तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी स्वाती कुरणे म्हणाल्या की, नवनिर्वाचित आमदार योगेश टिळेकर हे महाराष्ट्रात लोकप्रिय असा नेता आहे, त्यांच्या मागे युवकांची फळी मोठी आहे, भाजप पक्षासाठी त्यांचे काम चांगले आहे, पक्षाने त्यांच्यावर विश्वास टाकून विधानपरिषदेत आमदार म्हणून निवडून आणले आम्ही त्यांचे हडपसर भागात जल्लोषात स्वागत केले.

## विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचा सरकारवर हल्लाबोल

**मुंबई :** कोल्हापूर जिल्ह्यातील विशाळगड येथे अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली समाजकंटकांनी विशिष्ट समाजाला लक्ष करून घातलेला हैदोस निंदनीय आहे. विशाळगड येथील गजापूर येथे घडविलेली समाजविघातक घटना ही शासन पुरस्कृत असल्याने या घटनेमागील खरा सूत्रधार सरकारने समोर आणला पाहिजे, अशा शब्दात विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर सडकून टिका करत या दुर्दैवी घटनेचा निषेध केला आहे. जिल्हा पोलीस प्रमुख आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हे प्रकरण घडले आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांची तात्काळ बदली करावी, जिल्हा पोलीस प्रमुखांना तात्काळ निलंबित करावे, नुकसानग्रस्तांना सरकारने मदत करावी, हल्लेखोरांना पाठीशी न घालता या प्रकरणाची सरकारने उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील विशाळगड येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर आज विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या प्रचितगड या शासकीय निवासस्थानी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार वर्षा गायकवाड, माजी मंत्री नसीम खान, काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत उपस्थित होते.

वडेट्टीवार म्हणाले की, कोल्हापूर जिल्ह्यात पुरोगामी विचारांचा खासदार निवडून आल्याने जातीयवादी पक्षाच्या पायाखालची वाळू घसरली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अशा दुर्दैवी घटना घडविल्या जात आहेत. विशाळगड येथे आंदोलनाच्या नावाखाली तोडफोड करणारे शिवप्रेमी असूच शकत नाहीत. त्यामुळे हे हल्लेखोर कोण होते याचा सरकारने तपास केला पाहिजे.

## सोनवडी येथे निवृत्त नौसैनिक संघटनेच्या वतीने वृक्षारोपण



**सातारा :** सातारा जिल्हा निवृत्त नौसैनिक संघटनेच्या वतीने आपल्या पाचव्या वर्धापन दिनाचे औचित्य साधत ५०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते.

१५ जुलै २०२४ रोजी या वृक्ष लागवडीचा कार्यक्रम महाराष्ट्र राज्य वनविभाग व ज्ञानश्री इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनियरिंग टेक्नॉलॉजी, सज्जनगड परिसर यांच्या सहकार्याने सोनवडी ता. सातारा येथील राखीव वनक्षेत्रात पार पडला.

या उपक्रमात संघटनेचे जिल्ह्याभरात त्याचबरोबर पुण्या मुंबईत स्थायिक झालेले सदस्य त्यांच्या कुटुंबीयांसहित उत्साहाने हजर होते.

या कार्यक्रमासाठी सातारा सैनिक स्कूलचे प्राचार्य कॅप्टन एन. श्रीनिवासन साहेब उपस्थित होते. सातारचे माजी उपनगराध्यक्ष व संघटनेचे मार्गदर्शक श्री शंकरराव माळवदे साहेब यांनी या उपक्रमाचा उद्देश सांगितला. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत अध्यक्ष श्री. सूर्यकांत पडवळ यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. कार्यक्रमासाठी जवळपास शंभराहून अधिक निवृत्त नौसैनिक व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे कॅप्टन श्रीनिवासन साहेबांनी या उपक्रमाला शुभेच्छा देत वृक्षारोपण आणि संवर्धनाचे महत्त्व विशद केले. याप्रसंगी लावलेल्या रोपट्यांचे पुढील तीन वर्षासाठी संरक्षण आणि संवर्धन करण्याचा संकल्प असोसिएशनच्या सदस्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परळीचे वनपाल श्री. सोळंकी साहेबांनी मार्गदर्शन व सहकार्य केले.

कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी श्री. अश्फाक पटेल, राजू निकम, चंद्रशेखर चिटणीस, जयवंत खांडे, संतोष भोसले, अमित इनामदार, सुनील साळुंखे, जीवन शिंगाडे, उमेश साळुंखे, मोहन जगताप, निवृत्त विक्रीकर उपायुक्त अशोक साळुंखे, चंद्रकांत पतंगे, अशोक पवार या सदस्यानी विशेष परिश्रम घेतले.

### प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे साताऱ्यात वक्तव्य

## विधानसभेतही मतदानाचा कौल महाविकास आघाडीला मिळणार

**सातारा :** विधानसभा निवडणुकीतही जनतेचा कौल महाविकास आघाडीला राहील. तिन्ही पक्षात चर्चा करुन जागा वाटपाचा निर्णय होईल. सातारा जिल्ह्यातही मागीलपेक्षा चांगली स्थिती आघाडीची राहील, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर विशाळगडावरील अतिक्रमाणाला विरोध आहे. पण, पावसाळ्यात हे काम केले. यामध्ये राज्य शासन अपयशी ठरले आहे, असा आरोपही त्यांनी केला.

येथील राष्ट्रवादी भवनमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी आमदार बाळासाहेब पाटील, शशिकांत शिंदे, जिल्हाध्यक्ष सुनील माने, जिल्हा सरचिटणीस राजकुमार पाटील, सत्यजितसिंह पाटणकर आदी उपस्थित होते.

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले, राज्यातील विधानसभा मतदारसंघाचा दौरा सुरू केला आहे. पहिला टप्पा २८ जुलैपर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जाण्याचा प्रयत्न राहील. सातारा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत बळ आणि पैशाचा वापर झाला. त्यातच पिपाणी चिन्हाने काही मते खाल्ली. त्यामुळे आमचा उमेदवार काही मताने पराभूत झाला. आताच्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीत आम्ही ज्या जागा लढविणार आहोत. तेथेच चाचपणी करणार आहे. महाविकास आघाडी एकसंध कशी राहील हे पाहण्यात येते.

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना घरात स्थान आहे. पक्षात घेण्यासाठी कार्यकर्त्यांची मते जाणून घेऊ असे वक्तव्य केले आहे. त्यामुळे अजित पवार यांची घरवापसी होणार का ? असा प्रश्न पत्रकारांनी केला. यावर प्रदेशाध्यक्ष पाटील यांनी घरात कोणाला घ्यायचे हा खासगी प्रश्न आहे. पण, कार्यकर्ता संघर्ष करतो. त्यांची मते महत्वाची आहेत. अजित पवार यांच्या घरवापसीची चर्चा नाही, असे स्पष्ट केले. तर विशाळगडावरील अतिक्रमणाच्या प्रश्नावर त्यांनी तेथे एकत्रित येऊन ठराविक घरात मारहाण आणि लुटमार झाली. हे राज्याला भूषणावह नाही. कारण ही गंभीर घटना आहे. यामध्ये राज्य शासनाला पूर्ण अपयश आलेले आहे. यामधील दोषींवर कडक कारवाई व्हायला हवी. तसेच विशाळगडावरील अतिक्रमाणविरोधात आमची भूमिका आहे. पण, हे काम पावसाळ्यापूर्वी किंवा नंतर व्हायला हवे होते. तसेच याबाबत पर्यायी व्यवस्था करुन ते काढायला हवे होते, असेही त्यांनी सांगितले.

### पूजा खेडकर प्रकरणात योग्य कारवाई हवी...

प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर प्रकरणाबाबतही प्रदेशाध्यक्ष पाटील यांना प्रश्न करण्यात आला. यावर त्यांनी खेडकर यांना चुकीच्या पध्दतीने सर्टीफिकेट देण्यात आली आहेत. वाममार्गाने त्यांनी प्रवेश मिळवला आहे. याबाबत योग्य ती कारवाई झाली पाहिजे, असे सांगितले.

## शेतकऱ्यांना मिळणार आता दिवसा वीजपुरवठा

### सुरु होतोय हा मोठा प्रकल्प

**सातारा :** पुणे विभागात शेतीला दिवसा व शाश्वत वीजपुरवठा करण्यासाठी १ हजार ९१ मेगावॅट सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प निर्मितीच्या कामांना कार्यादेश देण्यात आले आहेत. यापूर्वी ९०० मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी कार्यादेश देण्यात आले होते.

त्यामुळे आता पहिल्या टप्प्यात पुणे, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात २७६ उपकेंद्रांसाठी एकूण १ हजार ९९१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प उभारण्यात येत आहेत. यामध्ये सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक ९८ उपकेंद्रांसाठी ८६७ मेगावॅटच्या सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पांचा समावेश आहे.

मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजनेत (२.०) पुणे विभागातील ७१० उपकेंद्राद्वारे शेतीला दिवसा वीजपुरवठ्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी ५ हजार ९१५ मेगावॅट सौर वीजनिर्मितीचे लक्ष्य असून, आतापर्यंत ७ हजार ६६९ एकर शासकीय जमिनीचे अधिग्रहण करण्यात आले आहे.

यामध्ये पहिल्या टप्प्यात २७६ उपकेंद्राद्वारे शेतीला दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी १ हजार ९९१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प उभारण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

पहिल्या टप्प्यातील २७६ उपकेंद्रांच्या परिसरातील हजारो शेतकऱ्यांना शेतीसाठी दिवसा व शाश्वत वीजपुरवठा होणार आहे. त्यामुळे सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पांना संबंधित ग्रामपंचायत व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणचे पुणे प्रादेशिक संचालक अंकुश नाळे यांनी केले आहे.

पहिल्या टप्प्यात पुणे जिल्ह्यात ५४ उपकेंद्रांसाठी ४२९ मेगावॅट, सातारा जिल्ह्यातील ३९ उपकेंद्रांसाठी २०८ मेगावॅट सांगली ४१ उपकेंद्रांसाठी ३१७ मेगावॅट, कोल्हापूर ४४ उपकेंद्रांसाठी १७० मेगावॅट आणि सोलापूर जिल्ह्यातील ९८ उपकेंद्रांसाठी ८६७ मेगावॅट असे २७६ उपकेंद्रांसाठी १९९१ मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प उभारणीचे काम संबंधित एजन्सीकडून सुरू आहे.

प्रत्येक ग्रामपंचायतीला पाच लाख प्रतिवर्ष असे तीन वर्षांत १५ लाख रुपयांचे अनुदान मिळणार आहे. विशेष म्हणजे, सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे, ते २५ वर्षे चालवणे आणि देखभाल व दुरुस्ती करणे याद्वारे राज्याच्या ग्रामीण भागात अंदाजे ६ हजार पूर्णवेळ, तर १३ हजार अर्धवेळ रोजगार निर्माण होतील. तसेच सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित केले जातील, अशा ग्रामपंचायतींना अंदाजे २०० कोटींपेक्षा जास्त अनुदान मिळणार आहे.

## कोयना धरण परिसरात दमदार पाऊस

**पाटण :** शनिवारी रात्रीपासून पाटण तालुक्यासह कोयना धरणांतर्गत विभागातील कोयना, नवजा, महाबळेश्वर परिसरात दमदार पाऊस पडत आहे. या पावसामुळे कोयनेसह स्थानीक अन्य छोट्या मोठ्या नद्या, नाले, ओढे ओसंडून वाहत आहेत. मागील चोवीस तासात धरणातील पाणीसाठ्यात ३.२९ टीएमसीने वाढ झाली असून आता धरणात एकूण ३८.२८ टीएमसी पाणीसाठा झाला आहे. धरणात सध्या प्रतिसेकंद सरासरी ६४,०५८ क्युसेक्स पाण्याची आवक होत असून पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. जोरदार पाऊस पाहता प्रशासनाकडून दक्षतेचा इशारा देण्यात आला आहे.

कोयना धरणांतर्गत कोयना, नवजा, महाबळेश्वर परिसरातही मुसळधार पाऊस पडत असून धरणातील पाणीसाठा तथा झपाट्याने वाढ होऊ लागली आहे. धरणात सध्या ३८.२८ टीएमसी उपलब्ध तर ३३.१६ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा आहे. धरणात सध्या प्रतिसेकंद सरासरी ६४,०५८ क्युसेक्स पाण्याची आवक होत असून पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. १०५.२५ टीएमसी पाणी साठवण क्षमता असलेले हे धरण पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी अद्यापही ६६.९७ तब्बल टीएमसी पाण्याची आवश्यकता आहे. मागील चोवीस तासात धरणाच्या पाणीसाठ्यात ३.२९ टीएमसीने तर पाणी उंचीत ५.६ फूट वाढ झाली आहे.

# सोलापुरात राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या मेळाव्यात गोंधळ

**सोलापूर :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या सोलापूर जिल्हा मेळाव्यात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासमोर पक्षांतर्गत धुसफूस उफाळून आली. पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्ष महेश माने यांची छबी मेळाव्यात व्यासपीठावरील पोस्टरवर लावली नसल्याच्या तात्कालिक कारणावरून गोंधळ झाला.

दुपारी मुरारजी पेठेतील सुशील रसिक सभागृहात राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या शहर व जिल्हा संवाद मेळावा आयोजिला होता. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील, माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, पक्षाचे निरीक्षक शेखर माने आदींच्या उपस्थितीत झालेल्या या संवाद मेळाव्यात विसंवाद घडला. आगामी विधानसभा निवडणुका लढविण्याच्या पार्श्वभूमीवर स्थानिक नेते, पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्त्यांचा कानोसा घेण्यासाठी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आले होते. परंतु पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष महेश साठे यांनी, पक्षात निष्ठावंतांची उपेक्षा होते, निष्ठावंतांना डावलले जात असेल तर पक्षात कशासाठी राहायचे, असा सवाल उपस्थित केला. पक्षात मंगल नसून तर दंगल दिसते, अशी टीकाही त्यांनी केली. त्यावरून गोंधळ उडाला. जिल्हाध्यक्ष बळीराम साठे यांनी असंतुष्ट महेश माने यांना रोखण्याचा प्रयत्न केला.

तथापि, मेळाव्यानंतर सभागृहाबाहेर पुन्हा गोंधळ झाला. महेश माने यांनी वाद घातला असता जिल्हाध्यक्ष बळीराम साठे यांनी त्यांना खडे बोल सुनावले.

महेश माने हे मागील काही दिवसांपासून नाराज आहेत. पक्षात निष्ठावंतांपेक्षा भाजपशी जवळीक असलेल्या मंडळींना स्थान दिले जाते. आपणास शिवसेना शिंदे गटात प्रवेश करण्यासाठी प्रस्ताव आला होता. परंतु आपण पक्षातच कायम राहण्याची भूमिका घेऊन पुन्हा घुसमट होत आहे, अशा शब्दांत महेश माने यांनी नाराजी व्यक्त केली. दरम्यान, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी या घटनेवर भाष्य करताना, पक्षात कसलीही दंगल नाही. सर्व मंगलच आहे, असा दावा केला.



# पावसाच्या खंडामुळे भात लागवड अडचणीत

## नाशिकमध्ये आतापर्यंत केवळ २७ टक्के

**नाशिक :** जिल्ह्यातील इगतपुरी, सुरगाणा, पेठ व त्र्यंबकेश्वर या घाटमाथा क्षेत्रात पुरेसा पाऊस नसल्याने भाताची पेरणी अतिशय संथपणे पुढे सरकत आहे. आतापर्यंत केवळ २७.३१ टक्के पेरणी झाली आहे. यंदाच्या हंगामात सरासरीच्या तुलनेत सर्वात कमी पाऊस सुरगाणा, इगतपुरी, पेठ आणि त्र्यंबकेश्वर या तालुक्यांत झाला आहे. मुळात घाटमाथ्यावरील या भागात दरवर्षी मुसळधार पाऊस होतो.

पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने आणि मागील महिन्यात पाऊस पडल्यानंतर त्यात बराच खंड पडल्याने भाताची पेरणी अडचणीत येण्याची भीती व्यक्त होत आहे. कृषी विभागाच्या अहवालानुसार जिल्ह्यात भाताचे ८७ हजार ४८८ हेक्टर इतके सरासरी क्षेत्र आहे. आतापर्यंत २३ हजार ८९० हेक्टरवर म्हणजे २७.३१ टक्के पेरणी झालेली आहे. घाटमाथा क्षेत्रात अधिक्याने भाताची लागवड केली जाते. त्यासाठी मुसळधार पाऊस लागतो. जूनमध्ये झालेल्या पावसात काहीअंशी पेरणी झाली होती. परंतु, नंतर पावसात खंड पडला. अलीकडेच उपरोक्त भागात तीन दिवस संततधार सुरू होती. यामुळे भाताच्या पेरणी क्षेत्रात सुमारे २० टक्के वाढ होऊ शकली परंतु, आजही बऱ्याच भागात मुसळधार पावसाची प्रतिक्षा आहे.

**जिल्ह्यात ७६ टक्के पेरणी**

जिल्ह्यात मुख्य पिकाखालील सहा लाख ५८ हजार ९१ सरासरी पेरणी क्षेत्र असून त्यातील पाच लाख एक हजार २३४ हेक्टर म्हणजे ७६ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे. यामध्ये ज्वारी (२१ टक्के), बाजरी (५७ टक्के), नाचणी (१६), मका (१०९), इतर तृणधान्य (२५) . तूर (३४), मूग (११७):, उडीद (१७), इतर कडधान्ये (५४), कारळे (१.७१), सोयाबीन (१३०). इतर गळीत धान्य (१.३४), कापूस (६६) अशी पेरणी झालेली आहे.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीची वाटचाल तीनशे कोटीवर

**सातारा :** सातारा जिल्ह्याचे सुपुत्र व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सन्माननीय एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. आतापर्यंत ३६ हजार रुग्णांवर उपचार करून सुमारे तीनशे कोटी रुपये अर्थसहाय्य केले असल्याची माहिती मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख मंगेश मंदाकिनी नरसिंह चिवटे यांनी सातारा येथे पत्रकार परिषदेत दिली.

ना वशिला ना ओळख थेट मिळते मदत... अशा पद्धतीने रुग्ण किंवा रुग्णांच्या नातेवाईकांनी थेट स्वतः अर्ज करावा. कोणत्याही मध्यस्तांच्यामार्फत अर्ज करू नये. तसेच यासाठी कुठल्याही खाजगी व्यक्ती किंवा संस्था सोबत आर्थिक देवाण-घेवाण करू नये. असे स्पष्ट करण्यात आलेले आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचा अर्ज

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष

मिळवण्यासाठी कोड स्कॅन करा. हॉस्पिटलची यादी सुद्धा उपलब्ध आहे. १७ मार्च २०१५ रोजी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्ष सुरू झाला परंतु कोविडच्या काळामध्ये तसेच पूर्वीच्या सरकारने याकडे फारसं लक्ष न देता फक्त अडीच कोटी रुपये खर्च केले. या उलट आताच्या सरकारने अडीच वर्षाच्या काळात सुमारे तीनशे कोटी रुपये ३६ हजार रुग्णांसाठी वैद्यकीय मदत मिळवून दिलेली आहे. यामुळे अनेकांचे प्राण वाचलेले आहेत. पारदर्शक कारभार होत आहे . लहान मुलावरही तातडीने उपचार होत असून काही मुलांच्यावर शस्त्रक्रिया केल्यामुळे लहान मुले बोलू लागलेले आहेत. एक जुलै २०२२ पासून श्री चिवटे हे कामकाज पाहत आहेत. पुढील महिन्यात एक ऑगस्ट रोजी यासाठी एक नवीन प येणार आहे. त्यामुळे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीसाठी सुलभता येणार आहे. विविध प्रकारच्या २० आजारासाठी ही योजना असून गंभीर आजारासाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून नागरिकांना मदत केली जाते. विहित नमुन्यात अर्ज, वैद्यकीय खर्चाचे प्रमाणपत्र, वार्षिक उत्पन्नाचा दाखला, लहान बाळांसाठी आईचे आधार कार्ड, रुग्णांचे शिधापत्रिका, आजाराबाबतचे चाचणी तपासणी अहवाल ,अपघातग्रस्तांसाठी एफ. आय. आर. रिपोर्ट तसेच शरीराच्या अवयवाच्या प्रत्यारोपणासाठी शासकीय समितीची मान्यता या सर्व गोष्टीची पेपर स्कॅन करून पीडीएफ फाईल मेल आयडी वर पाठवावी.


अशी ही योजना असून अर्ज पाठवण्याकरता टोल फ्री क्रमांक व्हाट्सअप हेल्पलाइन ८६५०५६७५६७ असा क्रमांक आहे. अर्ज पाठवण्याकरता रे. लीष-ाहर्सी.ळप असा ईमेल आयडी आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी मिळवण्यासाठी दररोज किमान २०० अर्ज प्राप्त होतात. या अर्जाची छाननी करून मंजुरी दिली जाते. त्यामुळे एकही अर्ज प्रलंबित नाही. असे श्री मंगेश मंदाकिनी नरसिंह चिमटे यांनी पत्रकारांना माहिती दिली. या योजनेमुळे गरीब, कष्टकरी, शेतमजूर, शेतकरी, सामान्य नागरिकांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामुळे खऱ्या अर्थाने लाभ मिळाले आहे.

सदरच्या योजनेसाठी संयोजक म्हणून रामहरी जिजाबाई भीमराव राऊत हे सुद्धा सहकार्य करत आहेत. मूळ संकल्पना ही श्री चिवटे यांची आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक गावातील व्यक्तींना याचा लाभ होईल. अशी सर्व यंत्रणा कार्यान्वित केली आहे. राज्याचे मुख्य मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित दादा पवार तसेच मान्यवर वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर्स, रुग्णालय व सेवाभावी संस्था यांचे मोलाचे योगदान लाभत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# महाराष्ट्रातील पहिले सूर्यनमस्कार शिल्प साताऱ्यात

**सातारा :** छत्रपतींची राजधानी असलेल्या सातारा शहराला ऐतिहासिक महत्त्व आहे सध्या छत्रपती शिवरायांनी हाती घेतलेली वाघ नखे साताऱ्यातील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात दाखल झालेले आहेत. ही अभिमानासद बाब ठरली आहे. तर दुसऱ्या बाजूला सातारा नगरपालिकेच्या वतीने महाराष्ट्रातील पहिले सूर्यनमस्कार शिल्प साताऱ्यात उभारण्यात आलेले आहे.

सातारा कोरेगाव रस्त्यावरील पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्गाच्या पुलाच्या खाली सध्या हे सूर्यनमस्कार शिल्प सातारकर व पर्यटकांचे आकर्षणाचे केंद्र बनलेले आहे. या ठिकाणी सूर्यनमस्काराचे सर्व गुण व पद्धत या ठिकाणी दाखवण्यात आले आहे. हे सोनेरी रंगाचे शिल्प भारत देशातील सुवर्णकाळ



नजरेसमोर आणून ठेवत आहे. यामुळे हे शिल्प आता पर्यटकांचे केंद्र बनलेले आहे. रिपब्लिकन पक्षाचे नेते राजेंद्र ओव्हाळ, सुनील ओव्हाळ, विजय ओव्हाळ तसेच वंचित बहुजन आघाडीचे सातारा शहर अध्यक्ष मिलिंद कांबळे व उपाध्यक्ष अमोल गंगावणे कुमार ओव्हाळ यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये नुकतेच या सूर्यनमस्कार शिल्पाची पाहणी करण्यात आली.

काळी सूर्योदयानंतर, श्वासाचे नियमन करून एका विशिष्ट क्रमाने १० किंवा १२ पवित्रे करणे याला सूर्यनमस्कार म्हणतात. सूर्यनमस्कारामुळे आपले आरोग्य चांगले राहते आणि आपल्या स्मरणशक्तीचाही विलक्षण विकास होतो. सूर्यनमस्कार किंवा साष्टांग नमस्कार ही तथाकथित सूर्य-उपासनाच आहे.

**शरीर तंदुरूस्त ठेवण्याचा मार्ग**

सूर्यनमस्काराचे नाना फायदे आहेत. यामुळे शरीर सदृढ राहण्यास मदत होतेच शिवाय वजनही नियंत्रणात राहते. सूर्यनमस्कार केल्याने लवचिकता, ताकद आणि एकूणच फिटनेस सुधारण्यास मदत करते. नियमित सूर्यनमस्कार केल्यास शारीरिक आणि मानसिक संतुलन वाढण्यास मदत होते. अशी माहिती सूर्यनमस्कार नियमितपणे करणारे अभ्यासक यांनी दिली आहे.

भारतीय तिथी माघ महिन्यातील रथ सप्तमी (शुक्ल सप्तमी); या रोजी जागतिक सूर्यनमस्कार दिवस साजरा केला जातो.

या दिवशी विविध ठिकाणी सकाळी सूर्योदयाला सुर्यनमस्कार स्पर्धा आयोजित केल्या जातात. उरसा शिरसा द्रष्ट्या वचसा मनसा तथा। पदाभ्यां कराभ्यां जानुभ्यां प्रणामः अष्टांग उच्यते असे सुभाषित याबाबत प्रसिद्ध असून सूर्यनमस्कार म्हणजे आपली शरीर संपदा चांगली ठेवणे यासाठी एक प्रयोगशाळा आहे. असे मत रिपब्लिकन पक्षाचे कवाडे गटाचे राज्य उपाध्यक्ष रमेश अनिल उबाळे यांनी व्यक्त केले आहे. या ठिकाणी तरुण पिढी सूर्यनमस्कार घालून व्यायाम करण्यास सुरुवात केली आहे.

# साताऱ्यात रयत शिक्षण संस्थेतील निकृष्ट कामांबाबत संस्थेचे मौन तर नागरिकांचे उपोषण




**सातारा :** बहुजन समाजाला शिक्षणाची द्वार खुली करून देणारे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याच रयत शिक्षण संस्थेमार्फत रयत सायन्स अँड इनोव्हेंशन ऍक्टिव्हिटी सेंटर रामनगर वऱ्ये या ठिकाणी आहे. सदरच्या कामाच्या निकृष्ट दर्जाच्या बाबत निवेदन दिले पण त्याची दखल घेतली नाही. अखेर जागरूक नागरिक मंदार गानु व सौ पल्लवी गानु यांनी सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. सदरच्या उपोषणाला अनेकांनी पाठिंबा दिला आहे. याबाबत माहिती अशी की, रयत शिक्षण संस्थेच्या रामनगर - वऱ्ये येथील कामांचा ठेका नीरज प्रो प्राइवेट लिमिटेड पुणे या कंपनीला दिलेला आहे. त्याबाबत लेखी तक्रार रयत शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडे करण्यात आली होती.

सदर संस्था योग्य ती कारवाई करीत आहे. असे पत्र दिनांक एक जुलै २०२४ रोजी पत्र पाठवून उपोषणाचे आंदोलनाचा मार्ग अवलंबू नये. अशी विनंती केल्यामुळे उपोषण आंदोलन झाले नाही परंतु ,त्याबाबत प्रत्यक्षात जागेवर पाहणी केली असता रयत शिक्षण संस्थेने कोणतीही कार्यवाही केली नाही. ही बाब अत्यंत गंभीर असून याबाबत सातारा जिल्हाधिकारी यांनी तातडीने कारवाई करावी व गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी अमर उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला वाढता पाठिंबा मिळत आहे.

सदर संस्थेमध्ये ग्रामीण भागातील बहुजन समाजाची अनेक मुले शिक्षण घेत आहेत. त्यांच्या जीवनात धोका निर्माण झाला आहे. एखादी घटना घडून गेल्यानंतर सर्वच यंत्रणा खडबडून जागी होते. परंतु, आता जे घडलेले आहे त्याबाबत जागृतपणाने माहिती देऊन सुद्धा कारवाई होत नाही. याला लोकशाही म्हणायचे आहे का? असा प्रति प्रश्न उपोषणकर्ते श्री मंदार गांनु यांनी केलेला आहे. सदर उपोषणाला सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ पत्रकार विजय मांडके, अजित जगताप व मान्यवरांनी भेट देऊन पाठिंबा दर्शवला आहे. रयत शिक्षण संस्थेसारख्या नावाजलेल्या शिक्षण संस्थेत एखाद्या ठेकेदाराची चूक दाखवून सुद्धा दुर्लक्ष होत असेल तर कर्मवीर भाऊराव पाटील यांचे विचार खरोखरच रयत शिक्षण संस्थेमध्ये अमलात आणले जातात की नाही? असा प्रश्न आता बहुजन वर्गाला पडलेला आहे.

# मायणी कोविड फसवणुकीची व्याप्ती वाढली : तालुक्यातून तक्रारीचा ओघ सुरूच

**मायणी :** मायणी ता. खटाव येथील मेडिकल कॉलेजवर असणाऱ्या कोरोना रुग्णालयात सन २०२० ते २०२२ पर्यंत कोरोना काळातील सेंटरवर अनेक मृत रुग्णांना जिवंत दाखवून मलीदा लाटणाऱ्या आमदार गोरे व त्यांच्या साथीदारांच्या विरोधात तक्रारीचा ओघ वाढला असून आतापर्यंत जवळजवळ १५ ते २० तक्रारी अर्ज वडूज पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाले आहेत.

कोरोनाच्या काळात मायणी मेडिकल कॉलेजमध्ये असणाऱ्या कोविड सेंटरमध्ये अनेक रुग्णावर उपचार केले गेले. मात्र कोविड काळात अनेक रुग्णांना डिस्चार्ज दिल्यानंतरही त्यांच रुग्णांना पुन्हा ॲडमिट दाखवून महात्मा फुले योजनेत बसवून अशिक्षित लोकांच्या खोट्या सह्या मारून लाखो रुपये आपल्या खात्यावर घेतल्याच्या अनेक तक्रारी पोलीस स्टेशनला दाखल झाल्या आहेत. माझ्या विरोधात एकही तक्रार दाखवा म्हणणाऱ्या आमदार जयकुमार गोरे यांचे पाय खोलात जाताना दिसत आहेत.

मायणी येथील तक्रारदर दीपक कणसे यांच्या तक्रारीमध्ये असे म्हटले आहे की माझी आजी १८ ऑक्टोबर २०२० रोजी कोरोना उपचारासाठी मायणी कोविड हॉस्पिटलला ॲडमिट केली होती. त्यावेळी डिपॉझिट म्हणून आम्ही २५ हजार रुपये भरले होते . उपचारानंतर माझ्या आजीला डिस्चार्ज मिळाल्यानंतर पुन्हा तीन महिन्यानंतर म्हणजे २३ जानेवारी २०२१ ते २ फेब्रुवारी २०२१पर्यंत उपचार घेतलेला दाखवून सदर पेशंटचे नाव महात्मा फुले योजनेत बसवून ४० हजार रुपयेचा मलिदा लाटल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. अशा अनेक तक्रारी पेशंटच्या नातेवाईकांनी दाखल केल्या आहेत . याही पेक्षा भयानक म्हणजे मृत व्यक्तींना पुन्हा जिवंत दाखवून त्यांना व्हेंटिलेटर लावून लाखो रुपये उकळण्याचे दिसून येत आहे.

गेल्या आठवड्यात याच विषयावर विधान सभेत आ. गोरे यांच्या या कर्तृत्वावर लक्षवेधी मांडण्यात आली होती. त्या अनुषंगाने तालुक्यातील अनेक पेशंटच्या नातेवाईकांनी याचिका कर्ते व संबंधित विभागाशी संपर्क केले असता असे निदर्शनास आले आहे की अनेक लोकांची फसवणूक झाली आहे.असे असताना आमदार महाशय पत्रकार परिषद घेऊन आपण कसे निर्दोष होते दाखवण्याचा बालिशपणा दाखवत आहेत.

> **आमच्याकडे काही लोकांच्या तक्रारी अर्ज प्राप्त झाले असून आम्ही सर्व शक्यता पडताळून पाहत आहोत वरिष्ठांच्या आदेशानुसार तपास सुरू असून यात सत्य असेल तर कोणीही असो आम्ही त्यांना पाठीशी घालणार नाही. - पी आय सोनवणे वडुज ,पोलीस स्टेशन.**

संपूर्ण कागदपत्रे पुरावे मा.कोर्टात सादर केल्यानंतर आपण निर्दोष असलेल्या कांगावा करत आमदार फिरत आहेत. पण येणाऱ्या काळात खरे खोटे लवकरच बाहेर येईल. खटाव माणचे आमदार मेलेल्याच्या टाळूवरचे लोणी खाण्यात किती माहीर आहेत हे येथील जनतेला दिसल्याशिवाय राहणार नाही.

**पोलीस प्रशासनावर आमदारांचा दबाव आहे का?**

कोविड काळात फसवणूक झालेल्या अनेक तक्रारी वडूज पोलीस स्टेशनला दाखल झाल्या आहेत व होत आहेत .परंतु तक्रारी अर्ज दाखल करून घेत असताना पोलीस कर्मचारी तक्रारी अर्ज दाखल करून घेण्यास टाळाटाळ करत आहेत.

# रमेश उबाळेनंतर आणखी दोन जिल्हाध्यक्षांची राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी

**कोरेगाव :** सातारा लोकसभा निवडणुकीमध्ये विजयी मार्गावर घेऊन जाण्याइतकी भक्कम बाजू मांडणारे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे मागासवर्गीय विभाग जिल्हाध्यक्ष श्री रमेश उबाळे यांनी पक्षाला रामराम केला. त्यानंतर आता वाहतूक संघटना व असंघटित कामगार सेलचे जिल्हाध्यक्ष व त्यांच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीचा त्याग करून इतर पक्षांमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रवादीमध्ये प्रचारानिमित्त तुतारी फुंकणारी नेतेगण पक्ष सोडून जात असल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अंतर्गत चालले काय? असा प्रश्न आता राजकीय विश्लेषकांना भेडसावू लागलेला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातीलच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गट असंघटित कामगार जिल्हाध्यक्ष संतोष ननावरे व वाहतूक संघटना जिल्हाध्यक्ष संजय पिसाळ यांनी शिवसेना शिंदे गटामध्ये पक्षप्रवेश केला .कोरेगाव विधानसभा मतदारसंघाचे नामदार श्री महेश शिंदे यांच्या हस्ते शिवबंधन बांधले. तुतारी ऐवजी धनुष्यबाण हाती घेतलेले आहे.

सर्वसामान्य कार्यकर्त्यांना संधी मिळावी यासाठी काँग्रेस व इतर पक्षात काम करणाऱ्या अनेकांनी जेष्ठ नेते आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांच्या विचारांवर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. पक्ष वाढीसाठी प्रयत्न केले. सातारा जिल्हा परिषद, पंचायत समिती, जिल्हा मध्यवर्ती बँक व ग्रामीण भागातील सोसायटी ,ग्रामपंचायत व इतर निवडणुकांमध्ये विरोधी पक्षाला चितपट केले. अशा कार्यकर्त्यांना पक्षीय पातळीवर पद दिले असले तरी सत्तेमध्ये सामावून घेतले जात नव्हते. याची त्यांच्या मनात खंत कायम होती. परंतु, पक्षाचे ध्येय धोरण कधीतरी सामान्य माणसाच्या कामी येईल या आशेपोटी ते पक्षात थांबले होते.

सातारा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत पक्ष वाढीसाठी ज्यांनी प्रयत्न केले ते पक्ष सोडून गेले पण सामान्य कार्यकर्ता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सोबत राहून नवीन चिन्ह खेड्यापाड्यात पोहोचवण्यासाठी हाती तुतारी घेऊन फुंकत होते. त्यांच्या ऐवजी आलिशान वाहनातून फिरणारे व ठेकेदारीमध्ये माहीर असणाऱ्याच लोकांना सोबत घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गट मधील काही नेतेगण वागत होते. त्यामुळे कमी जास्त प्रमाणात मते पडल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा पराभव झाला. या पराभवला जबाबदार असणारे आजही त्यांच्या सोबत आहेत. तर ज्यांनी निकाराची लढत दिली. त्यांच्यावर दूजाभाव होऊ लागला.

# स्पर्धा परीक्षा कठीण असते, हा विद्यार्थ्यांचा गैरसमज आहे : वनाधिकारी मृगजा यादव

**कोरेगाव :** स्पर्धा परीक्षा खूप कठिण असते असं काही नाही जे काही शाळा महाविद्यालयात शिकविले जाते ते मनापासून आत्मसात करावे म्हणजे नंतर खूप अभ्यासाचा ताण येत नाही पण सरकारी नोकरी हेच आयुष्याचं ध्येय नसावे ज्यात आपल्याला आनंद मिळतो आत्मसमाधान मिळते असं क्षेत्र नोकरी व्यवसायासाठी निवडलं तर कोणत्याही अडचणीवर मात करण्याची ताकद येते. काम करण्याचा आनंद मिळतो कामाचा कंटाळा येत नाही.जितके जास्त काम करू तितका आनंदच मिळतो. त्यामुळे आवडीच्या क्षेत्रात करिअर करावे प्रत्येकाने आपले दहावी बारावी नंतर काय करायचे हे अगोदरच ठरवणे गरजेचे आहे. सकारात्मकतेवर विश्वास ठेवून मार्गक्रमण करावे असे प्रतिपादन वनाधिकारी मृगजा यादव यांनी केले. त्या रहिमतपूर येथील हिंद नगरवाचनालय व ग्रंथालय रहिमतपूर या ग्रंथालयात स्पर्धा परीक्षा विद्यार्थी विद्यार्थ्यीनी यांना सहवास- संवाद करताना बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर, सुमित्रा यादव, जालिंदर यादव,कु.जैद शौकत नदाफ आय.आय.टी.ए आय आर २३१२ सुनिल माने, चेअरमन रहिमतपूर सहकारी बँक रहिमतपूर, प्रा.भानुदास भोसले, शिवाजी माने, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे होते. यावेळी. बोलताना मृगजा यादव पुढे बोलताना म्हणाल्या की, हिंद नगरवाचनालय व ग्रंथालयात आल्यानंतर ग्रंथालय पाहून असं ग्रंथालय ग्रामीण भागात असणे ही काळाची गरज आहे. या ग्रंथालयाचे मनापासून कौतुक केले. त्यांनी त्यांचे करिअर कसे केले ते विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव सांगितले. अभ्यास जेवढा वेळ होईल तेवढा वेळ करून घ्यायचा आणि कंटाळा आला की मैदानी खेळ खेळायचे. ४थी शिष्यवृत्ती धारक, ७वी शिष्यवृत्ती धारक, १०वी बोर्ड १००% उत्तीर्ण, १२वी ९७.९% गुणांनी उत्तीर्ण, बी टेक मध्ये ९१% उत्तीर्ण झाले. त्यानंतर रिलायन्स इंडस्ट्रीमध्ये सिलेक्शन,दुसरी नोकरी बँक ऑफ इंडिया मध्ये प्रोबेशनल ऑफिस अकरा महिने नोकरी व राजीनामा दिला.त्यांनंतर सन २०२०-२१ पासून युपीएससीची तयारी करण्यास सुरुवात केली. भरपूर अभ्यास केला. चिकाटी, आत्मविश्वास, सातत्य ठेवले. त्यामुळे सन २०२३मध्ये युपीएससी रँक -४७आय एफ ओ एस मध्ये सिलेक्शन झाले. माझी आई सुमित्रा जालिंदर यादव बी .एस. सी. बी. एड. फिजिक्स,वडिल जालिंदर राजाराम यादव एम. एस. सी .बी. एड. केमिस्ट्री नोकरी स्वामी विवेकानंद संस्था कोल्हापूर या संस्थेत शिक्षकांची नोकरी काले सुनेत्रा काव्य संग्रह लिहीला. यावेळी स्पर्धा परीक्षा विद्यार्थी विद्यार्थ्यीनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकाकुशंकांचे निरसन केले. व स्पर्धा परीक्षा विद्यार्थी विद्यार्थ्यीनी मार्गदर्शन केले.यावेळी अध्यक्षीय भाषणात कौस्तुभ गव्हाणे यांनी वनाधिकारी मृगजा यादव व जैद नदाफ यांचे अभिनंदन व कौतुक केले.